**पोलीस आयुक्त कार्यालय,छत्रपती संभाजीनगर शहर,येथील विधी अधिकारी गट-अ, गट-ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत.**

जा.क्र.कक्ष-१(१)विधी अधि.गट-अ,गट-ब,विधीअधि./पदे/जाहिरात/२०२४ -29 छ.संभाजीनगर दि. /१२/२०२४
1-1-2025

संदर्भ:-१. शासन निर्णय गृह विभाग क्र.एपीओ-३१०६/प्र.क्र/२२७/पोल-३/ दि.२१/०८/२००६
२. शासन निर्णय गृह विभाग क्र.एसपीपी-२००५/प्र.क्र.२४७/पोल-१०/दि.१५/०९/२००६
३. शासन निर्णय गृह विभाग क्र.एसपीपी-२००५/प्र.क्र.२४७/पोल-१०/दि.२६/०६/२००७
४.मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२-अ/३२२८/वि.अ./२०१२-१३ दिनांक १५/०२/२०१६
५.शासन निर्णय गृह विभाग क्र.डीपीपी-२०१४/प्र.क्र.०७/पोल-१०/दि.२१/०८/२०१८
६. मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२-अ/३२२८/ वि.अ./परिपत्रक/२०२२- दिनांक २८/०१/२०२२
७.मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२-अ/विधी अधिकारी-निवड मंडळ/२/२०/२०१७ मुंबई दिनांक ०७/०८/२०२४

----

वरील संदर्भान्वये, पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर शहर यांचे आस्थापनेवर विधी अधिकारी गट-अ-(०१) पद व विधी अधिकारी गट-ब (०१) पद व विधी अधिकारी यांचे ०२ पदे असे एकुण-०४ रिक्त पदे भरण्यासाठी खालील अटी व पात्रता पुर्ण असलेल्या उमेदवाराकडुन ११ महिन्यासाठी पुर्णत: कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

**सुचना :-**

सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचा नमुना **cp.aurangabad@mahapolice.gov.in** या वेबसाईटवरील **Flash** यावरुन डाऊनलोड करता येईल. उमेदवाराने सदरचा विहीत नमुन्यातील अर्ज पुर्णपणे भरुन विधी अधिकारी गट-अ, गट-ब, विधी अधिकारी पदासाठी नमुद करुन या कार्यालयाचे E-mail- **cp.aurangabad@mahapolice.gov.in** ऑनलाईन अर्ज **दिनांक १५/०१/२०२५** पर्यंत या कार्यालयास सादर करावा.त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.तसेच उमेदवारानी ऑनलाईन भरण्यात आलेल्या अर्जाची प्रिंट काढुन प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस मुळ कागदपत्रासह हजर रहावे .

**अटी व शर्ती:-**

१) सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल.उमेदवाराला शासकीय अधिकारी/कर्मचारी/म्हणून गणले जाणार नाही.

२) सदर नेमणुका या करार नियुक्ती पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी करण्यात येतील, ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा,११ महिन्याकरिता) वाढविता येईल.(३) वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवारांना पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे.असे सक्षम प्राधिका-यांचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसायास नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय करू शकणार नाही. जर खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) उमेदवाराची निवड लेखी परीक्षेनंतर मुलाखतीद्वारे करण्यात येईल.मुलाखत पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात येईल.

५) उमेदवाराना कोणताही प्रवास खर्च देय असणार नाही.

६) नियुक्त केलेल्या उमेदवारास शासन निर्णय गृह विभाग क्र.एसपीपी-२००५/प्र.क्र.२४७/पोल-१०/ दि.१५/०९/२००६ अन्वये परिशिष्ठ- ब प्रमाणे करारनामा **(Agreement)** करुन देणे अनिवार्य राहील.

७) करार पध्दतीने नेमणुक करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचा-यांना मंजुर वेतन आणि प्रवास खर्चाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

८) उमेदवारांनी खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा व अनुभव या अटी अर्ज सादर करण्याचा अंतिम **दिनांक १५/०१/२०२५ पर्यंत** पुर्ण करणे आवश्यक आहे.

९) अर्जा सोबत २.५ सेमी X२.५ सेमी आकाराचे सध्याचा दोन रंगीत फोटो अपलोड करावा व त्याच फोटोच्या दोन प्रति मुलाखतीसाठी येताना घेऊन याव्यात .

**करारातील मासिक रक्कम :-**

| अ.क्र. | विधी अधिकारी गट | मंजुर पदे | एकत्रीत अनुज्ञेय मासिक वेतन + दुरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी गट- अ | ०१ | रु.३००००+५०००/- |
| २ | विधी अधिकारी गट-ब | ०१ | रु.२५०००+३०००/- |
| ३ | विधी अधिकारी | ०२ | रु.२०,०००+३०००/- |
| एकुण | | ०४ | |

**शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा व अनुभव :- १. विधी अधिकारी गट-अ शैक्षणीक अर्हता व अनुभव:-**

१. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा तसेच तो सनद धारक असावा.
२. विधी अधिकारी गट- अ या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान ०७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
३. उमेदवारास गुन्हेगारी विषयक,सेवाविषयक प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबतीत ज्ञान संपन्न असावा ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.
४. उमेदवारास मराठी,हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे .

**उमेदवाराचे वय :-**

विधी अधिकारी गट-अ या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्ती वेळी ६२ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

**किंवा**

जी व्यक्ती शासकीय सेवेत प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्याविषयक सखोल ज्ञान असेल,त्याच प्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापीत समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभावासाठी ग्राहय धरण्यात येईल.सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील.शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**२) विधी अधिकारी गट-ब :-**

**शैक्षणिक अर्हता व अनुभव**

१. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा.तो सनद धारक असावा.

२. विधी अधिकारी गट- ब या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान (५ )वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.

३. उमेदवारास गुन्हेगारी विषयक,सेवाविषयक प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबतीत ज्ञान संपन्न असावा ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

४. उमेदवारास मराठी,हिंदी,व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान आवश्यक असेल.

**उमेदवाराचे वय :-**

विधी अधिकारी गट-ब या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्ती वेळी ६० वर्षा पेक्षा जास्त नसेल.

**किंवा**

जी व्यक्ती शासकीय सेवेत प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्याविषयक सखोल ज्ञान असेल,त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्तावित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभावासाठी ग्राहय धरण्यात येईल.सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील.शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**३) विधी अधिकारी :- शैक्षणिक अर्हता व अनुभव**

१. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा .तो सनद धारक असावा.

२. विधी अधिकारी या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान (५ ) वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.

३. उमेदवार गुन्हेगारी विषयक,सेवाविषयक प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबतीत ज्ञान संपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

४. उमेदवारास मराठी,हिंदी,व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

**उमेदवाराचे वय :-**

विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी ६० वर्षा पेक्षा जास्त नसावे.

**किंवा**

जी व्यक्ती शासकीय सेवेत प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी,प्रशासकीय व सेवाविषयक कायद्याविषयक सखोल ज्ञान असेल,त्याच प्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापीत समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभावासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील.शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**विधी अधिकारी गट-अ, ब व विधी अधिकारी - कर्तव्य व जबाबदा-या :-**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबी न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२) सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती या सोबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरवा करणे,जेथे शासन प्रतिवादी आहे,अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधीत अधिका-याच्या मदतीने तयार करणे

४) शपथपत्राचा नमुना तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-यांची मान्यता घेवून मा.न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाचे विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे.अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून त्याअनुषंगाने तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबंधीत सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागे पर्यंत पाठपुरावा करणे.

७) विधी विषयक कामाकाजा बाबत वेळोवेळी नमुद केलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८) पोलीस स्टेशन मध्ये प्रथम खबरी 'अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९) वेळोवेळी देण्यात आलेले इतर काम.

**मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२-अ/३२२८/वि.अ./ परिपत्रक/२०२२ दि.२८/०१/२०२२ अन्वये लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम व मुलाखत खालील प्रमाणे राहिल.**

**१.** मा.उच्च न्यायालय/मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणा समक्ष एखादय प्रकरणात दाखल करावयाचे परिच्छेद निहाय अभिप्राय किंवा शपथपत्र (संक्षिप्त स्वरुपात).

**२.** सेवा विषयक आणि फौजदारी स्वरुपाच्या प्रकरणाचा समावेश करण्यात येईल.

**३.** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा प्रकरणात किंवा फौ.प्र.सं १९७५ मधील कलम १९७ किंवा महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम १९९९ मध्ये मंजुरी मधील प्रकरणात अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यासाठी,आवश्यक माहिती.

**४.** लेखी परीक्षेत सेवाविषयक व फौजदारी प्रकरणातील वेगवेगळया व महत्वाच्या मुद्यावर सध्याची न्यायीकस्थिती (Settlad Position Of Law) काय आहे.या बाबत प्रश्न विचारण्यात येईल.

**५.** इतर न्यायालयीन कायदे विषयक प्रकरणे.

**तसेच मुलाखतीचे गुण खालील प्रमाणे राहतील.**

१. वर नमुद लेखी परीक्षा ५० गुणांची व तोडी परीक्षा २५ गुणांची असेल.

२. लेखी परीक्षेत व तोंडी परीक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकुण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नेमणुक करण्यात यईल .

३. नियुक्ती देणेसाठी कमीतकमी ६०% गुण असणे आवश्यक राहील.

तरी लेखीपरीक्षा व तोंडी (मुलाखत )आयोजित दिनांक व ठिकाण/स्थळ या कार्यालयाचे संकेतस्थळ aurangabadcitypolice.gov.in वर कळविण्यात येईल, त्यासाठी संबधीत उमेदवारांनी वेळोवेळी संकेत स्थळावर भेट दयावी.किंवा संकेत स्थळावर पाहणी करावी.

**( शिलवंत नांदेडकर )**
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय )
छत्रपती संभाजीनगर

# अर्जाचा नमुना

## अ) विधी अधिकारी गट-अ,ब व विधी अधिकारी पदाकरीता अर्ज

| | | |
|---|---|---|
| १. | विधी अधिकारी गट-अ | |
| २ | विधी अधिकारी गट- ब | |
| ३ | विधी अधिकारी | |

एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जा सोबत लिफाफ्यात जोडावा

**( टिप:- अर्जदारानी अर्ज भरतेवेळी लागु असलेल्या रकान्यात ✓ अशी खुण करावी )**

**कार्यालयीन उपयोगासाठी**

१. अर्ज क्रमांक :- | | | | | | | |

२.अर्ज स्विकारल्याचा दिनांक:- / /२०२४-२५

३.अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी दिनांकासह-

**सुचना :-** अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.
अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व ज्या ठिकाणची माहिती इंग्रजीमध्ये लिहिण्यास सांगितले आहे तीच फक्त इंग्रजीत लिहावी, आवश्यक नसेल तेथे खोडावे.

### अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :-

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव :- आडनाव नाव वडीलांचे / पतीचे नाव
मराठीत :------------------------------------------------------------------------------------------
इंग्रजीत

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२. पत्रव्यवहाराचा पत्ता : -----------------------------------------------------------------------

तालुका --------------------- जिल्हा--------------------- पिनकोड---------------

३. कायमचा पत्ता-----------------------------------------------------------------------

तालुका --------------------- जिल्हा---------------------- पिनकोड---------------

४. दुरध्वनी क्रमांक -लॅडलाईन:- ------------------- मोबाईल क्रमांक ---------------------------
ईमेल:-----------------------------------------------

५. जन्म दिनांक :------------------------------------ जन्मस्थळ:------------------------------------------
दिवस महिना वर्ष

६. **दिनांक:-१०/०१/२०२५** रोजीचे वय: -----------------------------
दिवस महिना वर्ष

७. लिंग:- पुरूष महिला

८. धर्म:---------------------

९. जात /प्रवर्ग

१०. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय नाही
योग्य असेल त्या ठिकाणी (✓) अशी खुण करावी.

**ब ) अर्जदाराची शैक्षणीक माहिती:**

**११. शैक्षणिक अर्हता :-**

| **शिक्षण** | **शैक्षणिक संस्थेच नाव (विद्यालय/महाविद्यालय )** | **बोर्ड / विद्यापीठ** | **उत्तीर्ण झाल्याचा दिनांक** | **मिळालेले गुण** | **मिळालेली टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| **१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी ) अथवा जुनी ११ वी परीक्षा** | | | | | |
| **२)उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी )** | | | | | |
| **३) पदवी** | | | | | |
| **४) विधी पदवी** | | | | | |

१२. **इतर शैक्षणिक अर्हता**

संगणक प्रशिक्षित आहे काय ? होय नाही

**१३. अर्जदाराची इतर माहिती**

अ) सनद घेतल्याचा दिनांक

ब )उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशिल

| अ.क्र. | न्यायालयाचे नावं | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

टिप:- वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**१३. अ.** अर्जदारास यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक/स्थानबध्द करण्यात/सिध्दोषी ठरवण्यात आले आहे काय ? किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय ? किंवा कोणत्याही विद्यापीठाकडुन किंवा इतर कोणात्याही शैक्षणीक प्राधिकरणाकडुन/संस्थेकडुन कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय /काढुन टाकण्यात आले आहे काय? **होय / नाही**

**१३. ब.** हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात,विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात /संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबीत आहे काय ? **होय / नाही**

( १३-अ किंवा १३-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक,स्थानबध्दता दंड, दोषसिध्दी, शिक्षादेष इत्यादीचा संपुर्ण तपशिल आणि न्यायालय/विद्यापीठ/ शैक्षणीक प्राधिकरणात इ.ठिकाणी प्रलंबीत असलेल्या प्रकरणाचे स्वरुप स्पष्ट करावे.)

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही

( दिनांकासह )

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री / सौ. /कु. -------------------------------------------------------------------- याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहिर करतो/करते की,अर्जातील माहिती सत्य व खरी आहे.जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील. व त्या बाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यास माझी हरकत असणार नाही.

तसेच भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**अर्जदाराची सही**

**सोबत :-** अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.